जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 MAR 2024
सकाळ

# आपत्ती व्यवस्थापन समजून घ्या

## डॉ. गायकवाड : गडहिंग्लजला जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ३ : जीवनातील प्रत्येक गोष्टीचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. सध्याच्या पिढीला आपत्तींचे निवारण करता आले पाहिजे. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन समजून घ्या, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले.

येथील शिवराज महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्र व राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा झाली. त्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पाटील बोलत होते. शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी.



गडहिंग्लज : शिवराजमध्ये आयोजित आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे डॉ. पी. टी. गायकवाड यांनी रोपाला पाणी घालून उद्घाटन केले. यावेळी डॉ. टी. एम. चौगुले, डॉ. अनिल कुराडे, ॲड. दिग्विजय कुराडे, डॉ. एस. एम. कदम आदी उपस्थित होते. (छायाचित्र : मज्जीद किल्लेदार).

एम. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. चौगुले म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र कक्ष स्थापन केले आहे. याद्वारे प्रशिक्षण देऊन अनेक स्वयंसेवक घडवीत आहे.'' प्रा. किसनराव कुराडे म्हणाले, ''आपत्ती व्यवस्थापन नव्या पिढीला समजले पाहिजे. त्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार झाला पाहिजे. संस्थेचे सचिव डॉ. अनिल कुराडे यांनी शिवराज विद्या संकुलाच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, २१ व्या शतकातील आपत्ती व्यवस्थापन व उपाययोजना काळाची गरज या संशोधनपर पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यशाळा मार्गदर्शक सत्यजित देसाई, जीवरक्षक दिनकर कांबळे, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, संचालिका प्रा. बिना कुराडे, प्रा. के. बी. केसरकर, संजय पाटील, रविनंदन जाधव, डॉ. सरोज बिडकर, रजिस्ट्रार डॉ. संतोष शहापूरकर, डॉ. जी. जी. गायकवाड, डॉ. एस. डी. सावंत, प्रा. डी. यू. जाधव आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. डी. पी. खेडकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. श्रद्धा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गौरव पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
तरुण भारत

# विद्यापीठाचा गांधी रिसर्च फौंडेशनसोबत करार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि जळगाव येथील गांधी रिसर्च फौंडेशन यांच्यादरम्यान आज सामंजस्य करार झाला. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी तर फौंडेशनच्या वतीने डॉ. डॉ. गीता धर्मपाल यांनी स्वाक्षरी केली. फौंडेशनचे डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी गांधीतीर्थाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. अशोक चौसाळकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वाटचालीविषयी माहिती दिली. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी फौंडेशनचे डॉ. अश्विन झाले उपस्थित होते.

04 MAR 2024 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वादविवाद हे ज्ञानसंवर्धनाचे चांगले माध्यम

## डॉ. तारा भवाळकर यांचे प्रतिपादन : डॉ. रमेश वरखेडे यांना डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

वादविवाद हे ज्ञानसंवर्धनाचे खूप चांगले माध्यम आहे. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये वादाला मोकळीक असेपर्यंत ज्ञान अखंड चालत राहणार आहे, असे प्रतिपादन लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्यावतीने आयोजित डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रमेश वरखेडे यांना मान्यवरांच्या हस्ते डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. भवाळकर म्हणाल्या, वितंडवादाने ज्ञान हे वर्धिष्णु होत असते आणि सांस्कृतिकपणातल्या वर्धिष्णुपणाचे हे महत्वाचे लक्षण आहे. अजूनही सत्व, तथ्य, ज्ञानाला आणि विचारांच्या समीक्षेला महत्व आहे. शिष्य ज्या वेळेस गुरूंचा पराभव करतो त्यावेळेस ज्ञान क्षेत्रात एक पाऊल पुढे पडलेले असते, हे या पुरस्कारामधून दिसून आल्याचे त्यांनी सांगितले. प्रसिध्द लेखिका–कवयित्री नीरजा आणि ज्येष्ठ समीक्षक डॉ.अविनाश सप्रे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यासक, संशोधक, शिक्षक आणि प्रशासक म्हणून डॉ. रमेश वरखेडे यांनी चांगले कार्य केलेले आहे. गुरू आणि शिष्याचे नाते, व्यावहारीक नाते आणि संशोधनातील नाते याचा उत्तम पाठ या ठिकाणी दिसून येतो.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ.सुनिलकुमार लवटे, मंगला वरखेडे, डॉ. राजन गवस, वसंत गायकवाड, कवी खलील मोमीन आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
तरूण भारत

# अध्ययन, कौशल्य विकासाने नेतृत्वाचा विकास

▪ प्रा. श्रीकृष्ण महाजन यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना प्रा. श्रीकृष्ण महाजन सोबत डॉ. राजू श्रावस्ती, डॉ. विद्यानंद खंडागळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी नेतृत्व म्हणजे काय समजून घेवून त्याविषयी असलेले गैरसमज दूर केले पाहिजेत. अजीवन व निरंतर शिक्षण घेतले तरच नेतृत्व विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. डॉ. राजू श्रावस्ती व डॉ. विद्यानंद खंडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. महाजन म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कामगिरीचे वारंवार मोजमाप केले पाहिजे. नेतृत्व म्हणजे दुसरे काही नसून नियोजनाच्या माध्यमातून भविष्याचे वेध घेणारे निर्णय तत्परपणे घेत राहणे होय. प्रा. अविनाश भाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. किशोर खिलारे यांनी आभार डॉ. मानले. डॉ. किशोर खिलारे, श्री. शरद पाटील व साहिल मेहता इत्यादींनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतेले. अधिविभागातील विद्यार्थी व संशोधक सहभागी झाले होते.

04 MAR 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नेतृत्व विकासासाठी अध्ययन, कौशल्य आवश्यक : प्रा. श्रीकृष्ण महाजन

## विद्यापीठात नेतृत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी नेतृत्व म्हणजे काय हे समजून घेऊन त्याविषयी असलेले गैरसमज दूर केले पाहिजेत. नेतृत्वाचे राजकारण हा पारंपरिक समज दूर करून मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. व्यावसायिक व व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून नेतृत्व संकल्पनेकडे पाहिले पाहिजे. आजीवन व निरंतर शिक्षण घेतले तरच नेतृत्व विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. महाजन म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याने व व्यक्तीने आपल्या कामगिरीचे वारंवार मोजमाप केले पाहिजे. नेतृत्व म्हणजे दुसरे काही नसून नियोजनाच्या माध्यमातून भविष्याचे वेध घेणारे निर्णय तत्परपणे घेत राहणे होय. 'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार' या उक्तीप्रमाणे वर्तन केल्यास नेतृत्व गुण वाढण्यास मदत होते. प्रास्ताविक प्रा. अविनाश भाले, तर आभार डॉ. किशोर खिलारे यांनी मानले.

कार्यक्रमामध्ये प्रा. डॉ. राजू श्रावस्ती यांनी 'स्व' आणि नेतृत्व विकास या विषयावर, तर डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी संवाद कौशल्य आणि नेतृत्व विकास या विषयावार मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील व साहिल मेहता आदींनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
पुढारी

# कौशल्ये विकसित करा, कलागुणांना वाव द्या : डॉ. ठकार

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये विकसित करावीत, कलागुणांना वाव द्यावा, त्याकरिता असे कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरतात, असे प्रतिपादन डॉ. एच. एम. ठकार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. विभागामार्फत आयोजित 'सिंहावलोकन २०२४' या एकदिवसीय व्यवस्थापन कार्यकमप्रसंगी ते बोलत होते. सेंटर फॉर इनोव्हेशन इनक्युबेशन अँड लिंकेजसचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या स्पर्धेत बेळगावच्या के.एल.एस. इनस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, एज्युकेशन अँड रिसर्चचे विजेतेपद पटकावले. डॉ. अण्णासाहेब गुरव म्हणाले, स्वतःच्या विकासासाठी आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करून आत्मविश्वासाने पुढे येणे महत्त्वाचे आहे. संवाद साधणे, चांगले संबंध प्रस्थापित करणे आणि स्वत:जवळचे कौशल्य योग्य प्रकारे दाखवून देणे ही व्यवस्थापनामधील कौशल्याची त्रिसूत्री आहे. यावेळी डॉ. तेजश्री बोडके, जयश्री लोखंडे, डॉ. परशराम देवळी आदींसह विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले.

या स्पर्धेत अभिविभागासह विविध १६ महाविद्यालयांतील २१० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. बिझनेस पॉन, बिझनेस क्विझ, अॅड सम्राट, बुल बिअर बॅश, पोस्टर प्रेझेंटेशन आणि ट्रेजर हंट आदी प्रकारांत विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्ये आणि गुणवत्तेचे दर्शन घडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. सोमवार (दि.४) पासून या महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. गुरुवार, दि. ७ पर्यंत हा महोत्सव रंगणार आहे. स्पर्धेत विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे २००० खेळाडू सहभागी होणार आहेत.

क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धिबळ, ॲथलॅटिक्स आणि मॅरेथॉन अशा आठ खेळ प्रकारांचा या महोत्सवात समावेश करण्यात आला आहे. दररोज सकाळी सात ते सायंकाळी सात या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडागंणावर या स्पर्धा होणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचे हस्ते प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी सकाळी साडेसात वाजता होणार आहे. यावेळी सर्व अधिष्ठाता, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटन कार्यक्रमात गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा सत्कार केला जाणार आहे. यावेळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू विविध प्रात्यक्षिके सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात आजपासून शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे २०२३-२४ साठी शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा क्रीडा महोत्सव दि. ४ ते ७ मार्च या कालावधीत सकाळी ७ ते संध्याकाळी ७ या वेळेत आयोजित केला आहे. स्पर्धेमध्ये क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, मॅरेथॉन आदी आठ खेळांचा समावेश आहे. स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे २ हजार खेळाडूंनी नोंदणी केली आहे. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते, तसेच प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत सोमवार, दि. ४ रोजी सकाळी ७.३० वाजता क्रीडा मैदानावर होणार आहे. गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांचा सत्कार त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यावेळी प्रात्यक्षिके सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे सोमवार (दि. ४) सकाळी ७.३० वाजता क्रीडा मैदानावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उद्‌घाटन होणार आहे. या क्रीडा स्पर्धा ७ मार्चपर्यंत सुरू राहणार आहेत. क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुध्दीबळ, ॲथलेटिक्स, मॅरेथॉन, या आठ खेळांचा समावेश असून, विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे २ हजार खेळाडूंनी नोंदणी केली आहे. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सर्व अधिष्ठाता, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती राहील. गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेच्या पारितोषिक प्राप्त खेळाडूंचा सत्कार त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यावेळी प्रात्यक्षिके सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
04 MAR 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनुकीय समुपदेशनाने आनुवंशिक आजार टाळणे शक्य

## डॉ. हेमा पुरंदरे यांचे प्रतिपादन; डॉ. आप्पासाहेब वरूटे व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जनुकीय समुपदेशाने आनुवांशिक आजार टाळणे शक्य आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध आनुवंशशास्त्र तज्ज्ञ, जेनेटिक हेल्थ केअरच्या संस्थापक संचालक डॉ. हेमा पुरंदरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात आयोजित 'शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू : डॉ. आप्पासाहेब वरूटे स्मृती व्याख्यानमाले'त त्या १५ वे पुष्प गुंफताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

आनुवंशशास्त्र म्हणजे काय हे सांगत डॉ. पुरंदरे म्हणाल्या, थॅलेसेमिया, डाऊन सिंड्रोम, टर्नर सिंड्रोम, क्लेनफिल्टर सिंड्रोम, सिस्टीक फायब्रॉसिस, टेस्टिक्युलार फेमिनायझेशन सिंड्रोम, सिकल सेल ॲनेमिया, हॅटिंग्टन आदी आजार जनुकांमधील बदलाने होतात. ते आजार पुढच्या पिढीत संक्रमित होऊ शकतात. अशा जनुकीय बदलांमुळे होणाऱ्या आजारांवर वेळीच उपचार केले नाही, तर ते अजून गुंतागुंतीचे होतात.

कुटुंबात काही आजार परंपरेने दिसतात असे सांगत डॉ. पुरंदरे म्हणाल्या, या आजारांचे मूळ, त्याचे निदान वंशावळीचा इतिहास अभ्यासून, आजारांच्या वैशिष्ट्यावरून व वैद्यकीय चाचण्यांद्वारे केले जाते. त्याद्वारे मातापित्यांचा विकार संततीमध्ये कितपत संक्रमित होऊ शकतो हे सांगता येणे तसेच त्या संततीची जनुकीय रचना, संख्या, आकार यांचाही अभ्यास करता येतो. निदानासोबत जनुकीय समुपदेशन महत्त्वाचा भाग असल्याचे सांगत, 'जिनोमकुंडली' जुळते का, हे बघूनच लग्न करा. जनुकीय विविधता हे निरोगी संततीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे नात्यातील लग्नसंबध टाळा. प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर आनुवंशिकतेच्या चाचण्या करा. जनुकीय विकारांची माहिती लपवू नका. यामुळे असामान्य अर्भकांचा जन्मदर कमी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी केले. डॉ. आण्णा गोफणे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे, उज्ज्वला गोखले, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. यंकनी, डॉ. कांबळे, डॉ. वाळवेकर, डॉ. भिलावे, डॉ. माने आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 MAR 2024
सकाळ

# असमान वितरण, अतिवापर : डॉ. पल्लवी भोसले

■ "कोल्हापूर शहराचा पाणीपुरवठा पहिल्यास अनेक भागात पाण्याचे असमान वितरण तसेच काही ठिकाणी पाण्याचा अतिवापर होत आहे. लोकांना जास्तीचे पाणी मिळाले, तर ते पाणी साठवण्याबाबतचे भान विसरतात. त्यामुळे पालिकेने इष्टतम (कमीत कमी) पाणीपुरवठा करण्याची गरज आहे. पालिकेकडून कॉमन नळ आणि पाईपला असलेल्या गळतीची तपासणी वेळोवेळी करावी. त्यासाठी पालिकेकडून वॉटर ऑडिट करणे गरजेचे आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नागरिकांमध्ये पाणी संवर्धनाबाबतची जागरूकता आणि महापालिकेकडून पाणीपुरवठा व्यवस्थापन चांगले असणे गरजेचे आहे," अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. पल्लवी भोसले यांनी व्यक्त केली.

04 MAR 2024

जनसंपर्क कक्ष

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेलो इंडिया गेम्समधील ॲथलेटिक्समध्ये शिवाजी विद्यापीठाचा दबदबा

■ खेळाडूंकडून ४ सुवर्ण, ३ रौप्य व १ कांस्य पदकाची कमाई

प्रतिनिधी

कोल्हापूर

गुवाहाटी (आसाम) येथे सुरु असलेल्या चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समधील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी जोमदार कामगिरी करत ४ सुवर्ण, ३ रौप्य व १ कांस्य पदकाची कमाई करत दबदबा निर्माण केला. भारतीय खेल प्राधिकरण व असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी यांच्या वतीने खेलो इंडिया गेम्सचे आयोजन करण्यात आले आहे.

खेलो इंडिया गेम्स शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिनिधीत्व केलेल्या सुदेक्षना शिवणकरने १०० मीटर धावणेत सुवर्ण तर २०० मीटर धावणेत रौप्य, रेश्मा केवठेने १० हजार मीटर धावणेत सुवर्ण आणि अभिजीत भोसले व कुशल मोहितेने डेक्याथलॉनमध्ये सुवर्ण पदक पटकावले. याचबरोबर विकास खोडकेने ११० मीटर अडथळा शर्यत प्रकारात रौप्य, अनुष्का दत्तात्रय कुंभारने ४०० मीटर अडथळा शर्यत प्रकारात कांस्य पटकावले. याचबरोबर ४ बाय ४०० मीटर मिक्स रीले या प्रकारात शिवाजी विद्यापीठ संघाने रौप्य पदक जिंकले. हे पदक जिंकलेल्या संघात प्रतिक पाटील, रिया पाटील, राजवर्धन पाटील, अनुष्का कुंभार या चौघांचा समावेश आहे. वैयक्तिक गटातही प्रतिक पाटीलने चांगली कामगिरी करताना २०० मीटर धावणेमध्ये तर अनुष्का कुंभारने ४०० मीटर धावणेमध्ये चौथा क्रमांक पटकावला. ४ बाय १०० मीटर रीले मात्र शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. या संघात प्रतिक पाटील, विकास खोडके, अखिलकुमार खोत, सार्थक शेलार आदींचा समावेश आहे. वरील सर्व खेळाडूंना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक प्रा. आर. टी. पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, सुभाष पवार, सुनील बाबर, अभिजीत महस्कर, डॉ. सविता भोसले यांचे मार्गदर्शन लाभत आहे.




**कोल्हापूर : चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सअंतर्गत झालेल्या स्पर्धांमध्ये ८ पदकाची कमाई केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंसोबत डॉ. इब्राहीम मुल्ला, रामा पाटील व डॉ. सविता भोसले आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
तरुण भारत




कोल्हापूर : यशस्वी खेळाडूंचा सन्मान करताना मान्यवर.

# साळोखेनगर डी. वाय. पी. चे हॉलीबॉलमध्ये यश

वार्ताहर
कळंबा

शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर अंतर्गत इंजीनियरिंग लीड कॉलेज स्पर्धा पार पडल्या. भारती विद्यापीठ कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या मुलींच्या हॉलीबॉल संघाने डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग साळोखेनगरच्या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी यशस्वी नागपुरे मधुरा पाटील, साक्षी कांबळे, शर्वरी दबडे, अनुराधा राठोड, विभावरी देवणे, एकता चुयेकर, मनाली चव्हाण, अंकिता चौगुले पियुशा जगताप प्रज्ञा पाटील या खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष संजय डी पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार युवा ऋतुराज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. अभिजीत माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, प्रशासन अधिकारी सुयोग पाटील, फिजिकल डायरेक्टर सचिन पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाचा महिला रग्बी संघ विजेता

**कोगे :** आसाम, गुवाहाटी येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर झालेल्या चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२४ मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या मुलींच्या रग्बी संघाने विजेतेपद पटकावले. स्पर्धेत एकाही विरुद्ध संघास ट्राय न करू देता, शून्य हा अंक पार करू न देता एक नवा विक्रम शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नोंदवला आहे. मुलींच्या संघातील खेळाडू असे : शुभांगी गावडे (कर्णधार), कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, पूजा कुंभार, शीतल शिनगारे, साक्षी कुंभार, स्वाती माळी, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, नेहा पाटील, प्राची पारखे, पूनम पाटील. संघास प्रशिक्षक दीपक पाटील, संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे, अर्जुन पिट्टुक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले.